P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

**प्रेसनोट** **दिनांक - २२/०७/२०२३**

**वाकड पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या अट्टल गुन्हेगारांवर मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी एम.पी.डी.ए. कायदयान्वये केली स्थानबद्धतेची कारवाई**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाकड पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **राहुल विलास चव्हाण, रा. काळाखडक झोपडपट्टी, वाकड, पुणे.** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने त्याच्या साथीदारांसह **वाकड पोलीस स्टेशन,** हिंजवडी पोलीस स्टेशन, खडकी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये **कोयता सारखी जीवघेणी हत्यारांसह, खुनाचा प्रयत्न, दरोडा, खंडणी मागणे, दुखापत, गंभीर दुखापत, अपहरण करणे, तडीपार आदेशाचा भंग करणे, चोरी करणे, सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे, चोरी, खंडणीसाठी तोडफोड करुन दहशत निर्माण करणे व बेकायदेशीरपणे घातक हत्यार जवळ बाळगणे, तसेच बेकायदेशीरपणे जमाव जमवुन दुखापत करणे व तोडफोड करणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत.

सदर सराईत गुन्हेगारावर **एकूण १६ गुन्हे दाखल** आहेत. प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे, पिंपरी चिंचवड** यांनी नमुद इसमाचे विरुध्द **एम.पी.डी.ए. कायद्यान्वये येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा येथे दिनांक २१/०७/२०२३ रोजी पासून स्थानबध्दतेचे आदेश** पारीत केले आहेत.

सदरची कामगीरीही पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे, पोलीस सह आयुक्त, डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी, श्रीमती, स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. बाबासाहेब कोपनर, सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे-१), पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. गणेश जवादवाड, वाकड पोलीस स्टेशन, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, (पी.सी.बी. गुन्हे शाखा), पोलीस हवालदार, सचिन चव्हाण, पो.ना. कारभारी (पी.सी.बी. गुन्हे शाखा), स.पो.फौ. पाटोळे, वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड यांनी केली आहे.

मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी दहशत निर्माण करणा-या सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबधक कारवाई करण्याचे अवलंबिले आहे. एम.पी.डी.ए. कायदयान्वये स्थानबद्धतेची **एकूण ४** कारवाई करण्यात आलेल्या असून यापुढे ही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

**आरोपी विरूध्द दाखल असलेले गुन्हे**

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र.नं. | कलम | सध्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | हिंजवडी | २२२/२०१४ | भादंवि. १४३, १४७, १४८, ३२४, ४२७, ५०४ | न्यायप्रविष्ठ |
| २ | हिंजवडी | ४१९/२०१४ | भादंवि. १४३, १४७, १४८, ३२४, ४२७, ५०४ | न्यायप्रविष्ठ |
| ३ | खडकी | ६८/२०१५ | भादंवि. ३९५ | न्यायप्रविष्ठ |
| ४ | वाकड | ३२५/२०१५ | भादंवि. ३२४, ३२३, ५०४, ३४. | न्यायप्रविष्ठ |
| ५ | वाकड | ३२७/२०१५ | भादंवि. ३२६, ५०४, ५०६(१), ३४ | न्यायप्रविष्ठ |
| ६ | वाकड | ७२८/२०१६ | भादंवि. ३८७, ४२७, २९४, ५०४, ५०६(२) | न्यायप्रविष्ठ |
| ७ | वाकड | ७५६/२०१६ | भादंवि. ३२६, ५०४, ४२७, ३४ | न्यायप्रविष्ठ |
| ८ | वाकड | ०३०/२०१७ | महा.पो.का.क. १४२ | न्यायप्रविष्ठ |
| ९ | वाकड | १८०/२०१८ | महा.पो.का.क. १४२ | न्यायप्रविष्ठ |
| १० | वाकड | ४६८/२०१८ | आर्म ॲक्ट ४(२५), महा.पो.का. क. १४२, | न्यायप्रविष्ठ |
| ११ | पिंपरी | ३३०/२०१८ | भादंवि. ३०७, १४३, १४७, १४८, ४२७, ५०४ | न्यायप्रविष्ठ |
| १२ | वाकड | १४५/२०२० | भादंवि. ३६३, ३४ | न्यायप्रविष्ठ |
| १३ | वाकड | ४१२/२०२० | भादंवि. ४६१, ३८०, ३४ | न्यायप्रविष्ठ |
| १४ | वाकड | ३५८/२०२१ | भादंवि. ३७९, ५११, ३४ | न्यायप्रविष्ठ |
| १५ | वाकड | ८४४/२०२२ | भादंवि. ३२४, ३२३ | न्यायप्रविष्ठ |
| १६ | वाकड | ८६९/२०२२ | भादंवि. ३०८,३२४,३२३,५०६,५०४, आर्म ॲक्ट ४(२५) | न्यायप्रविष्ठ |

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड आयुक्तालय